# शेक्सपिअर गेला उडत...

प्रल्हाद जाधव

पात्रे :
त्रिलोक काशीकर (४५ वर्षे)
प्रतिभा काशीकर (४० वर्षे)
रूपक काशीकर (१६ वर्षे)
राजा मोपलवार (४० वर्षे)

अंक पहिला/प्रवेश पहिला.

(त्रिलोक काशीकर याचं मुंबईतील शासकीय निवासस्थान. टू रूम किचन. हॉलमध्ये दिवाण. खुर्च्या, सोफा, टी पॉय. एकीकडे टेबल-खुर्ची.कोपऱ्यात देव्हारा, टी.व्ही., रेडियो. एकीकडे फोन. शेल्फवर बरीच पुस्तकं. मोकळ्या जागी पुस्तकं आणि वृत्तपत्रांचे गट्ठे पडलेले. एका ठिकाणी भिंतीवर एक पुणेरी पगडी आणि उपरणं टांगलेलं आहे, ते नजरेत भरतं. दुसरी खोली त्रिलोकचा मुलगा रूपक याच्या अभ्यासाची. तिथं त्याचं टेबल-पुस्तकं, वह्या. तिथंही शेल्फवर भरपूर पुस्तकं. त्या खोलीची मधली भिंत अदृश्य. तिकडे तो अभ्यास वगौरे करताना दिसतो. तिकडचं बोलणं इकडं ऐकू येतं. विरुद्ध बाजूला विंगेत किचन आणि दुसरीकडे बेडरूम अशी कल्पना. रूपकची खोली ते किचन हा प्रवास संपूर्ण रंगमंचावरून करावा लागतो... पडदा उघडतो तेव्हा त्रिलोक दिवाणावर मांडी घालून बसलेला. हनुवटीवर दाढी. पुढ्यात एक छोटासा घडीचा मेज. त्यावर तो लिहीत आहे. त्याचा चष्मा कधी डोळ्यांवर, कधी डोक्यावर तर कधी छातीवर लोंबकळत असतो. उजव्या हाताची तर्जनी आणि मध्यमा यात पेन तसाच धरून हातवारे करत बोलण्याची त्याची ढब. रूपक यंदा दहावीत. खोलीत येरझारा घालत अभ्यास करीत आहे. बघावं तेव्हा त्याच्या हातात पुस्तक. प्रतिभा स्वयंपाकघरात चहा करीत आहे. दिवस सुट्टीचा. सकाळ. पडदा उघडतो तेव्हा फोन वाजत आहे. सगळे कामात त्यामुळे फोन कोणी घ्यायचा हा प्रश्न.)

रूपक : (पुस्तक हातात घेऊन बाहेर येतो आणि फोन घेतो) हॅलो ऽऽऽ ...हां नमस्कार... कोण बोलतंय? कोण पाहिजे आपल्याला? त्रिलोक काशीकर ? हो, हो, बरोबर, देतो, देतो... कोण बोलतंय आपण? बरं, बरं... (ओरडत) बाबाऽऽऽ फोन...

त्रिलोक : (तेथूनच लिहिता लिहिता) कोण आहे?

रूपक : प्राध्यापक सुमन चौधरी... यावल!

त्रिलोक : हो, आलो आलो. (फोन घेतो आणि बोलू लागतो. रूपक तेथेच उभा. नजर पुस्तकात) हॅलोऽऽऽ हो, हो... नमस्कार... नमस्कार मॅडम! ओळखतो ना! मागे एकदा पत्र आलं होतं तुमचं, ‘पाचा पाचा पस्तीस’ हे नाटक आवडल्याबद्दल. हो... हो... काय म्हणता? बरोबर... कुठे पाहिलात प्रयोग? अच्छा अच्छा... आलं लक्षात. थँक्यू... थँक्यू... खरं आहे तुमचं म्हणणं, महाराष्ट्रात एकही स्पर्धा अशी नाही की जिथं प्रयोग झाला नाही त्याचा. पत्रं छान लिहिलंय तुम्ही. ‘या धावपळीच्या या युगात माणसं कशी भरकटत चाललीत आणि जीवनाचं गणित कसं चुकत चाललंय सगळ्यांचं हे नेमकं दाखवलंय लेखकानं’ असं म्हटलंय तुम्ही त्यात, लक्षात आहे माझ्या... थँक्यू... थँक्यू... तुमच्यासारखे चाहते असल्यावर आणखी दुसरं काय हवं ? (प्रतिभा चहा घेऊन येते) बरं... बरं... ओके, थँक्यू... थँक्यू... नवीन? नवीन तसं काही खास नाही... काय? व्यावसायिक रंगभूमीसाठी लिहू? काय सांगू तुम्हाला? व्यावसायिक नाटकाची गणितं वेगळी असतात सगळी ! पण चाललेत प्रयत्न. बघू काय होतं ते! ओ के... शुभेच्छांबद्दल आभार ! कधी आलात मुंबईला तर अवश्य घरी या... (प्रतिभा त्याला अंगठा आणि तर्जनी हलवत मानधनाची खूण करून दाखवते.) आणि हो... त्या संस्थेला सांगा, परवानगी घेतली नाही माझी की मानधनसुद्धा पाठवलं नाही... काय प्रकार आहे हा? मी नोकरी करतो म्हणून ठीक पण नुसतं लेखनावर जगणारे लेखक आहेत त्यांनी कसं जगावं? लेखकाला मानधन देणं– मग जे काही असेल ते, हा सगळ्यांच्या शिस्तीचा भाग झाला पाहिजे काय? ओ के... बाऽऽऽय... थँक्यू !

प्रतिभा : घ्या, (चहा देते) कुणाचा होता फोन?

रूपक :  (उत्साहानं) यावलवरनं प्रा. सुमन चौधरी.

प्रतिभा : (रूपकला) तू काय करतोयस इथं? चल आत हो आधी ! दहावीचं वर्ष आहे यंदा  तुझं ! (तो तिथंच थोडा बाजूला होऊन घोटाळतो. नजर पुस्तकात)

त्रिलोक : 'पाचा पाचा पस्तीस' आवडल्याचं म्हणाल्या. मागं ते पत्रं आलं होतं बघ  त्यांचं...

प्रतिभा : हो, हो... आठवलं, किती सुंदर लिहिलं होत त्यांनी ! 'एखादा तरी माणूस आपल्या आजूबाजूला असा असतो की तो आपल्या  कामाची गंभीरपणे दखल घेत असतो ...'

त्रिलोक : बरोबर लक्षात आहे तुझ्या!

प्रतिभा : प्रेक्षकांतसुद्धा असा एखादा प्रेक्षक असतो की, तो अगदी गंभीरपणे आपलं नाटक  बघत असतो. त्याच्यासाठी करायचं असतं नाटक ...

त्रिलोक : वा ! आपण नांदी प्रेमाची ही एकांकिका बसवत होतो तेव्हा पहिल्या दिवशी हे विजयाबाईंचं सूत्र सांगितलं होतं मी तुला...

प्रतिभा : अगदी बरोब्बर !

रूपक : (मधेच) बाबाऽऽऽ

त्रिलोक : अरे तू जा म्हटलं ना अभ्यासाला?

रूपक : आमच्या शाळेत एकांकिका स्पर्धा आहे.

त्रिलोक : मग मी काय करू?

रूपक : एक चांगली एकांकिका लिहून द्या ना !

त्रिलोक : वेड लागलंय का तुला? दहावीचं वर्ष आहे
हे, यंदा फक्त अभ्यास ! किती वेळा सांगू !

रूपक : प्लीज बाबा... तुम्ही इतकी नाटकं लिहिता... बक्षीसं मिळवता, सगळीकडं तुमचं  कौतुक सुरू असतं... द्या ना एखादी लिहून पटकन...

त्रिलोक : पट्कन? काय खायचं काम आहे का ते! आणि मी आता असं सटर-फटर  लेखन करणं बंद केलंय, आठवीत असताना दिली होती ना एकदा?

रूपक : त्याला आता दोन वर्ष झाली. आई, तू सांग ना बाबांना...

प्रतिभा : ते काही जमणार नाही. यंदा फक्त अभ्यास... पुढच्या वर्षी कर काय  करायचंय ते ! (रूपक नाराजीनं पाय आपटू लागतो) एकदा  नाही म्हटलं म्हणजे नाही ! (त्रिलोकला) आणि तुम्हीपण जरा तुमचं ते लेखन- वाचन थोडं कमी करून याच्या अभ्यासाकडं लक्ष द्या थोडं, चांगले मार्क्स नाही  मिळाले तर दारोदार फिरावं लागेल ॲडमिशनसाठी !

त्रिलोक : अगं एक दिवस मिळालाय सुट्टीचा तर लिहू दे की जरा. काय कटकट करतेस? तो राजा तिकडं जीव काढतोय नवीन नाटकासाठी. हा एवढा प्रवेश लिहून होऊ दे...  (रूपकला) हे बघ, तुला जर काही अडलं तर विचारायचं, मी देईन समजावून. ओ.के.?

रूपक : एक शंका विचारायची होती ...

त्रिलोक : बोल लवकर !

रूपक : (पुस्तक उघडून) `ॲनॉमलस बिहेविअर ऑफ द वॉटर` म्हणजे काय ते जरा सांगा ना समजावून. त्रिलोक : (गोंधळून) ॲनॉमलस बिहेविअर ऑफ द वॉटर? हे बघ, तू मला हिंदी, इंग्रजी, संस्कृत आणि मराठी या भाषांमधलं काही अडलं तर विचारायचं. तुझ्या त्या फिजिक्समधलं आपल्याला काही कळत नाही, ते डिपार्टमेंट आईकडे !

रूपक : हा प्रश्न फिजिक्समधला नाही बाबा.

त्रिलोक : मग?

रूपक : सायन्समधला आहे !

त्रिलोक : (अज्ञान उघडं पडल्यामुळे खेकसत) देऊ का एक ठेवून आता ! (प्रतिभा, रूपक हसतात. "चल, मी करते तुला मदत" असं म्हणत प्रतिभा रूपकसोबत अभ्यासाच्या खोलीत जाते. त्रिलोक पुन्हा लिहिण्याचा प्रयत्न करू लागतो.)

प्रतिभा : अभ्यास घेऊ लागते. हं, चल, वाच बरं...

रूपक : (मोठ्यानं वाचू लागतो.) ॲनॉमलस बिहेविअर ऑफ द वॉटर प्लेज ॲन इंपॉर्टन्ट रोल इन द सर्व्हायव्हल ऑफ ॲक्वेटिक ॲनिमल्स ॲन्ड प्लॅन्टस इन कोल्ड कंट्रिज. ड्युरिंग विंटर द टेंपरेचर ऑफ वॉटर इन सरफेस गोज ऑन डिक्रिजिंग टू झिरो डिग्री सेल्सियस ॲन्ड फायनली इज कन्व्हर्टेड इन टू आईस, व्हाईल द वॉटर बिलो द आईस कंटिन्यूज टू रिमेन ॲट फोर डिग्री सेल्सियस... (त्याचे वाचन सुरू असताना दारावरची बेल वाजते. बेलचा आवाज नाटक सुरू होण्यापूर्वीच्या घंटेसारखा.)

प्रतिभा : (बाहेर येत) कोण आलं आता सकाळी सकाळी? अभ्यासपण घेऊ देत मेले... बघता बघता परीक्षा येईल आता. आलेsss आलेsss ... या घरात दहावीचा विद्यार्थी आहे, कृपया त्रास देऊ नये अशी पाटीच लावावी लागेल आता बाहेर... आलेsss आलेsss (दरवाजा अर्धवट उघडून) नही, नही, आज नही! नही बोला ना एक बार? नही मतलब नही! अगले हप्ते आना... गुरुवार दोपहर को... ठीक... ठीक है... अब जाव ! (दरवाजा बंद करून पुन्हा रूपकच्या खोलीकडे निघते.)

त्रिलोक : (तिला अडवत) कोण होतं?

प्रतिभा : रद्दीवाला भौय्या, दुसरं कोण !

त्रिलोक : मला वाटलं राजा की काय !

प्रतिभा : तुम्हाला सदासर्वदा राजा दिसतो! जरा सांभाळून राहा त्याच्यापासनं!

त्रिलोक : त्याचं टॅलेन्ट माहीत नाही तुला. एक दिवस नाव काढील दिग्दर्शनाच्या क्षेत्रात, बघत रहा तू ! मागं लागतील निर्माते...

प्रतिभा : मित्र झाला म्हणून डोक्यावर बसवू नका. कधी हजार, कधी पाचशे असं करता करता किती पैसे उसने घेतलेत त्यानं ते त्या परमेश्वरालाच माहीत. वरून (त्याची नक्कल करून दाखवत) 'भरपूर साखर घालून चहा करा वहिनी!'

त्रिलोक : स्ट्रगलर्सना असंच जगावं लागतं प्रतिभा. अमिताभ बच्चन असू दे नाहीतर लता मंगेशकर, भीमसेन जोशी असू दे नाही तर सचिन तेंडुलकर! प्रतिभा : हो पण प्रत्येकालाच काही अभिताभ बच्चन, लता मंगेशकर, सचीन तेंडूलकर, भीमसेन जोशी होता येत नाही...

त्रिलोक : पण प्रयत्न तर करता येतो? एकदा ब्रेक मिळाला की मग बघ... 'महाराष्ट्र करंडक'मध्ये त्यानं माझी 'रिमझीम'किती सुंदर बसवली होती तूच सांग! पन्नास मिनिटं प्रेक्षक जागचे हलले नाहीत. सगळ्या पेप्रातनं कौतुक आलं छापून. तिथंच आचरेकरांनी ऑफर दिली त्याला व्यावसायिक नाटकाची...

प्रतिभा : मुंबईत इतके पोचलेले दिग्दर्शक आहेत ते ह्या औरंगाबादवरनं आलेल्या नवशिक्या दिग्दर्शकाला संधी देतील असं खरंच वाटतं तुम्हाला?

त्रिलोक : प्रॉमिस केलंय आचरेकरांनी त्याला... 'चांगलं नाटक आणायचं' एवढीच अट आहे!

प्रतिभा : तुम्ही चांगलं लिहिता पण तुमच्या हातून व्यावसायिक नाटक लिहून होणं कठीण!

त्रिलोक : लेखकाच्या मागे तगादा असला की होतं लिहून. 'शांततेचा आवाज' कसं लिहिलं माहिताय ना ? ते कणकवलीवाले मुक्काम ठोकून बसले होते.

प्रतिभा : ते प्रयोगिक नाटकाचं वेगळं...

त्रिलोक : हो पण त्या नाटकानंच नाव दिलं का नाही मला ? राजा मागं लागला म्हणून त्याच्यासाठी 'रिमझिम' लिहिली... इतकं कौतुक झालं की व्यावसायिकची ऑफर आली. जा, अभ्यास घे रूपकचा, मला लिहू दे...

प्रतिभा : जो येतो तो तोंडदेखल्या कौतुक करतो. स्क्रिप्ट घेऊन जातो आणि पुढं, 'सारं कसं शांत शांत...' झेरॉक्सचे पैसेपण देत नाही कोणी. कॉपिज् काढता काढता माझी पर्स रिकामी होते.

त्रिलोक : एक नाटक येऊ दे, मग पैसे मोजत बैस नुसती. सोन्यानं मढवून काढतो तुला...

प्रतिभा : (उपरोधानं) हो... सोन्यानं मढवून काढतो ! त्यासाठी अत्रे, पु.लं.च पाहिजेत.

त्रिलोक : जा जरा एका वाटीतून खडीसाखर आणि शेंगदाणे घेऊन ये.

प्रतिभा : हे काय मध्येच ?

त्रिलोक : अगं पु.लं.ना लिहिताना अधून-मधून खडीसाखर आणि शेंगदाणे लागायचे खायला!

प्रतिभा : असं असतं तर मग खडीसाखर आणि शेंगदाण्यांचे व्यापारीच लेखक झाले नसते? प्रतिभा लागते त्यासाठी...

त्रिलोक : एवढी मोठी बोलती-चालती, जिवंत प्रतिभा सोबत असताना आणखी काय हवंय मला? आणि काय ग 'नांदी प्रेमाची' ही माझी एकांकिका वाचूनच माझ्या प्रेमात पडलीस ना तू? प्रतिभा असल्याशिवाय झालं हे?

प्रतिभा : हो, पण एकांकिका लिहिणं वेगळं, स्पर्धेसाठी लिहिणं आणि व्यावसायिक रंगभूमीसाठी लिहिणं वेगळं... मान मोडून एव्हढी बारा नाटकं लिहिलीत पाच वर्षात... एक तरी आलं का त्यातलं? नुस्ती स्पर्धेत नाटकं होऊन आणि तिथं कौतुक होऊन काय फायदा? मानधन नाही ते नाहीच... नोकरी आहे म्हणून चाललंय सगळं !

त्रिलोक : 'काळ अनंत आणि पृथ्वी विपुल आहे. दखल घेणारा कोणी ना कोणी तरी एक दिवस सापडेलच,'

प्रतिभा : भवभुतीनं म्हटलंय ना असं ?

त्रिलोक : बरोबर, जा, खडीसाखर आणि शेंगदाणे–

प्रतिभा : राम गणेश गडकरी लिहिताना काय करायचे माहीत आहे ना?

त्रिलोक : काय करायचे?

प्रतिभा : विड्या ओढायचे!

त्रिलोक : म्हणजे म्हणं काय तुझं?

प्रतिभा : पु.लं.च्या वरताण लिखाण व्हावं म्हणून खडीसाखरेऐवजी विड्या आणून देते... बसा फुंकत... (दोघंही हसतात.)

राजा : 'एकच प्याला' लिहून झाल्यावर गडकऱ्यांनी काय केलं माहिताय का?

प्रतिभा : काय केलं?

राजा : दुसरं काय? (अंगठा उलटा करून दाखवत) हॅऽऽऽ (दोघंही हसतात. दारावरची बेल वाजते. प्रतिभा आलेऽऽऽ आलेऽऽऽ म्हणत दार उघडते. राजा येतो. चटेरी-पटेरी कपडे, खांद्याला झोळी. सतत हालचाल, एका जागी न थांबणं हे त्याचं वौशिष्ट्य)

राजा : काय म्हणताहेत महाराष्ट्राचे शेक्सपिअर? कुठवर आलं 'नव्या युगाची आशा'? नाव जरा जुन्या वळणाचं आहे पण चालेल आपल्याला...

प्रतिभा : तुम्ही त्यांना हरभऱ्याच्या झाडावर चढवा आणि आमचा त्रास वाढवा.

राजा : आता होईल त्रास वैनी पण एकदा का त्याची नाटकं चालायला लागली की मग नुसते पैसे मोजत बसाल तुम्ही !

प्रतिभा : उगाच स्वप्नं दाखवण्यात काय अर्थ आहे भावजी ? गेल्या दोन वर्षांत वेगवेगळ्या विषयावरची पाच नाटकं लिहिली तुमच्या नादाला लागून. काय झालं पुढं? इतक्या वेगानं त्या शेक्सपिअरनंपण लिहिलं नसेल कधी.

राजा : हे मात्र खरं ! शेक्सपिअर त्याच्या उमेदीत वर्षाला दोन नाटकं लिहायचा. आमच्या या शेक्सपिअरनं मात्र दोन वर्षात पाच नाटकं लिहून
त्याच्यावरही ताण केली हे निश्चित ! त्रिलोक काशीकर आगे बढो हम तुम्हारे साथ है !

प्रतिभा : काय आगे बढो? आजवर सगळी मिळून बारा नाटकं झाली. पण आगे बढण्याच्या ऐवजी पिछे पिछेच चाललोय आम्ही... तुम्ही आग्रह धरलात म्हणून कॉमेडीलासुद्धा हात घातला. 'रडाल तर हसाल'! काय झालं पुढं ? 'नटरंग' च्या कामतबाईकडं पडलंय, दोन वर्षात साधा फोन नाही आला तिचा ! 'सेक्स' हा विषय हिट होतो म्हणून 'भिंतीला डोळे असतात' लिहिलं. काय झालं पुढं? मंगलमूर्ती सराफांकडे पडून आहे ते स्क्रिप्ट ! भेटायला पण तयार नाही तो माणूस.

त्रिलोक : (तिला थांबवत) अग हो... हो...

प्रतिभा : काय हो... हो... ! एकदा तर यांना हाकलूनच लावलं त्यानं त्यांच्या ऑफिसातनं... ही लेखकाची किंमत ? थोरामोठ्यांची चरित्र आवडतात लोकांना म्हणून पां.वा.काण्यांवरं 'वळून मागे पाहताना' लिहिलं, काय झालं ? 'नाट्य-झंकार'चा तो कावळे, यांचा फोनपण घेत नाही कधी, काय नाटक काढणार तो यांचं? इतकी कचरा नाटकं येताहेत बाहेर सध्या की सोन्याला काही किंमतच राहिली नाही...

राजा : वा, वैनी ! इतकं छान बोलल्याबद्दल भरपूर साखर घालून चहा टाका आधी.

प्रतिभा : काय चांगलं बोलले?

राजा : आमच्या मित्राच्या नाटकांना निदान सोनं तरी म्हणालात.

प्रतिभा : ते तुम्ही मला सांगताय मला?

राजा : म्हणजे ?

प्रतिभा : अहो यांच्या लेखनावर पाघळूनच लग्न केलं नाही का मी यांच्याशी !

राजा : अरे हो, कोणती रे ती एकांकिका?

त्रिलोक : नांदी प्रेमाची !

राजा : हो... हो... नांदी प्रेमाची ! काय गाजली होती रे ती त्या वेळी ! जवळपास प्रत्येक स्पर्धेत व्हायची.

त्रिलोक : का होणार नाही? नेपथ्य नाही की रंगभूषा नाही... प्रकाशयोजना नाही की संगीत  नाही. पात्रंही फक्त दोनच. शिवाय जुन्या नव्या पिढ्याना जोडणारा प्रेमासारखा  चिरंतन विषय. मग काय हवं आणखी ?

प्रतिभा : ती करणाऱ्या पंचवीस-तीस मुलां-मुलींची लग्न झाली एकमेकांशी.

त्रिलोक : हो, अगदी बरोबर.

राजा : तुमचंपण त्यामुळेच जुळलं ना !

प्रतिभा : म्हणून तर सांगतेय. (पगडी - उपरण्याकडे बोट दाखवत) ते काय पगडी-उपरणं...  जपून ठेवलंय अजून आठवण म्हणून !

त्रिलोक : हिनं ती नाकातली नथ, भरजरी शालू आणि ते नटी-सूत्रधाराचे हारसुद्धा आठवण  म्हणून जपून ठेवलेत अजून. अरे नांदीलाच टाळ्या पडायच्या...

प्रतिभा : आणि त्यातल्या तुमच्या त्या पदाला तर अगदी हमखास वन्समोअर मिळायचा !

त्रिलोक : हो की ! (ते पद गुणगुणु लागतो)

राजा : वैनी, तुम्ही याच्या लेखनावर भाळलात की आवाजावर ?

प्रतिभा : दोन्ही थोडं थोडं...

त्रिलोक : नुसता अभिनय करण्यात मला काही दम वाटला नाही कधी.

प्रतिभा : मनात आणलं असतं तर अभिनयाच्या क्षेत्रात चांगली बाजी मारली असती यांनी पण यांना पहिल्यापासून शब्दांचा नाद, तो वाढतच गेला. त्यात मंत्रालयात नोकरी  मिळाली मग थांबलाच अभिनय.

त्रिलोक : नटाला त्या त्या नाटकातली फक्त एकच भूमिका करायला मिळते. लेखकाला सर्व भूमिका जगायला मिळतात, कमी महत्त्वाचं आहे का हे ?

राजा : हे मात्र अगदी खरं.

त्रिलोक : मंत्रालयात खर्डेघाशी करत, निर्बुद्ध वरिष्ठांचे आदेश पाळावे लागतात, हा भाग वेगळा !

प्रतिभा : मंत्रालयाला कशाला नाव ठेवता? नोकरी नसती तर काय स्थिती झाली असती आज आपली? एक दमडी तरी मिळते का तुमच्या नाटकावर कधी? (राजावर गुगली  टाकत) तुम्ही ‘नांदी’चे किती प्रयोग केले भावजी?

राजा : शंभरपर्यंत मजल मारली आणि मग थांबलो !

प्रतिभा : (पेचात पकडत) पण लेखकाला काय मानधन द्यावसं वाटलं नाही कधी तुम्हाला!

राजा : सगळी हौशी पोरं वैनी! घरादारावरनं ओवाळून टाकलेली. आम्हालाच  खायचे वांधे तर कुठन देणार मानधन तुम्हाला?

प्रतिभा : रोख बक्षिसं मिळाल्यावर तरी विचार करायचा ना? यांच्या एकांकिका-नाटकं करता  करता नावं मिळवली अनेकांनी, कलाकार कोट्यातून नोकऱ्या मिळवल्या, घरं  मिळवली, लग्नं केली आणि हे राहिले असेच. राहायला स्वत:चं घरसुद्धा नाही.

राजा : घर घर काय करता? एक नाटक चालायला लागू द्या याचं... सिमेंटच्या गोणीतनं  पैसे घेऊन येईल. तीन बेडरुमचा फ्लॅट घेईल फटक्यात !

प्रतिभा : तीन बेडरूम कशाला, दोन आम्हाला आणि एक तुम्हाला?

राजा : (हसत) आता चेष्टा करताय तुम्ही पण त्याच्याबरोबर माझंही नशीब  उजळणार आहे हे लक्षात ठेवा. तुमचं सगळं कर्ज फेडून टाकतो का नाही बघत रहा तुम्ही.

प्रतिभा : उगाच स्वप्नांचे इमले रचू नका. नाटकावर जगता येईल लेखकाला अशी स्थिती नाही इथं. दिलंच कुणी चुकूनमाकून मानधन तर कागद आणि शाईचे पौसेसुद्धा सुटत नाहीत त्यातनं. खरं सांगायचं तर आमच्या सुखी संसाराचं क्रेडिट आमच्या त्या मायबाप सरकारला! मंत्रालय झिंदाबाद!

राजा :  नेमकं काय काम करतोस रे तू तिथं?

त्रिलोक : बेळगाव-कारवार भागातील वादग्रस्त ठरलेला मराठीभाषक प्रदेश महाराष्ट्रात विलीन व्हावा या यासंबंधीचं कामकाज पाहणारा एक स्वतंत्र विभाग आहे तिथं. जवळपास आठशे गावं आहेत वादग्रस्त ठरलेली. महाराष्ट्रापासून तुटलेल्या त्या लोकांना महाराष्ट्रात  परत आणावं, त्यांना काही सवलती मिळवून द्याव्या हा उद्देश. पण काम म्हणशील  तर काही नाही. ते सगळं प्रकरण आता सुप्रीम कोर्टात असल्यामुळं कोणतंही  पत्र आलं किंवा फाईल आली की त्यावर ‘प्रकरण न्यायप्रविष्ठ’ असा शेरा मारून  बंद करून टाकतो आम्ही! (मोठ्यानं हसतो)

राजा : स्टाफ किती आहे?

त्रिलोक : अरे कसला स्टाफ घेऊन बसलास? मी डेस्क ऑफिसर, माझ्या हाताखाली दोन सहाय्यक, एक शिपाई आणि डोक्यावर तो पाटील. प्रमोटेड आय.ए.एस.! एखाद्याला शिक्षा द्यायची असली की पाठवतात आमच्या विभागात सचिव म्हणून!

प्रतिभा : पण त्यांच्या नाकर्तेपणामुळेच तर भरपूर वेळ मिळतो ना तुम्हाला लिहायला?

राजा : शिवाय स्टेशनरी फुकट सगळी ! (हसतो) वैनी–

प्रतिभा : (त्याच्या मनातील ओळखत–) भरपूर साखर घालून चहा करा फर्स्टक्लास !

राजा : (हसत) अगदी बरोबर.

प्रतिभा : आणते दोन मिनिटात (आत जाते.)

राजा : (त्रिलोकला) तर मग काय करतोहेस शेवट?

नाटक घेऊनच जाईन मी आज!

त्रिलोक : चॅयला जमत नाही रे नीट...

राजा : ‘शांततेचा आवाज’सारखं अफलातून नाटक लिहिणाऱ्या लेखकाला लिहिता येत नाही असं होईल का कधी?

त्रिलोक : पण स्पर्धेतच अडकलं ना तेही !

राजा : पण बंगालीत अनुवाद झाला, हिंदीत झालं, देशभर पोहोचलं– हे काय कमी आहे?

त्रिलोक : खरं आहे ते एका अर्थी.

राजा : शिवाय साहित्य अकादमीच्या पुरस्कारासाठी गेलंय आता ते पुस्तक.

त्रिलोक : ते खरंय पण...

राजा : पण काय?

त्रिलोक : मला ते गुळमुळीत, गोड गोड, हलकं-फुलकं, लिहिणं खरंच जमत नाही रे ! प्रयत्न करतोय पण गंभीरच होत चाललंय सगळं...

राजा : हे बघ आपल्याला सोपं लिहायचंय या ‘ब्लॉक’ मधून बाहेर ये आधी. त्या टेन्शनमुळं आणखी कठीण लिहायला लागशील. कितीतरी चांगली  कथानकं तुझ्या हट्टापायी फुकट गेलीत आजवर.

त्रिलोक : तसंच होतंय रे.
राजा : तेच म्हणतोय मी... 'पाचा पाचा पस्तीस!' इतका सुंदर विषय पण त्यात जीवनाचं जडजंबाल तत्त्वज्ञान सांगून काय साधलंस? सामान्य प्रेक्षकाला काय कळतंय त्यातलं? 'काळ्यावरती जरा पांढरे' लिहून सर्व कलाक्षेत्राचा राग ओढवून घेतलास, 'डावा हात उजवा हात' लिहून सत्ताधाऱ्यांशी पंगा घेतलास... नाटक हे काही सूड उगवण्याचं माध्यम नाही हे लक्षात ठेव ! स्पर्धेत ठीक आहे पण व्यावसायिकला अजिबात नाही चालणार हा दृष्टीकोन.
त्रिलोक : पण शेवटी साहित्याचा काही एक उद्देश असतोच ना?
राजा : असतो की ! पण नाटक हे साहित्य नाही. ज्याचे प्रयोग होतात ते नाटक आणि जे कपाटात पडून राहातं ते साहित्य. अनेक कलांचं मिश्रण असतं नाटकात. रचनेचा भाग महत्त्वाचा असतो तिथं,टेक्निक महत्त्वाचं असतं.
त्रिलोक : तेच टेक्निक त्रासदायक वाटतंय मला... उत्स्फूर्तता हरवून गेल्यासारखं वाटतंय... नाटकातल्या प्रत्येक क्षणावर लेखकाचा शिक्का असायला हवा असं
वाटतं मला.
राजा : (भांडत) नट नसतो का तिथं? दिग्दर्शक नसतो? संगीतकार, प्रकाश योजनाकार, निर्माता नसतो? नाटक एकट्या लेखकाचं नसतं कधी. टीम वर्क असतं ते! तू अजरामर वगैरे होण्याचं खूळ डोक्यातून काढून टाक आणि सुंदर, सोपं, सहज असं लिही काहीतरी. रोजच्या कटकटींनी कंटाळलेल्या जीवाला चार घटका विरंगुळा देणारं, आनंद देणारं... त्रासलेल्या, कंटाळलेल्या, आजारी माणसाला दिलासा देणारं, उमेद देणारं, त्याचं मनोरंजन करणारं! नवी साडी नेसून, गजरा माळून नाटकाला येणारी बाई म्हणजे तर साक्षात लक्ष्मीच... घरातली सगळी कामं करून, कपडे धुवून, भांडी घासून, चहाचा शेवटचा कप विसळून येते नाटकाला ! तिला बोअर करणं म्हणजे तिचा अपमान नाही? स्वत:चे पैसे खर्च करून लोक कशाला येतील डोकेदुखी करून घेण्यासाठी?
त्रिलोक : अरे पण म्हणून काय नुसता धांगडधिंगा घालायचा?
राजा : प्रेक्षकांचा विरंगुळा हा मुद्दा महत्त्वाचा हे विसरू नकोस तू !
त्रिलोक : काही डोकं चालत नाही रे, मला थोडा वेळ दे यार, विचार करायला...
राजा : बरं चालू दे तुझं, (असं म्हणत राजा रूपकच्या खोलीत जातो. त्रिलोक विचारमग्न.)
रूपक : (मोठ्यानं वाचत आहे.) जागतिकीकरणामुळे अनियंत्रित स्पर्धेला ऊत आला असून लहान उद्योगांचं अस्तित्व धोक्यात आलं आहे. बहुराष्ट्रीय कंपन्या गरीब राष्ट्रांच्या साधन संपत्तीचा अनिर्बंध वापर करत आहेत, त्यातून चंगळवाद उदयाला आला आहे. मूलभूत मानवी मूल्यांचा झपाट्यानं ऱ्हास होत असून श्रीमंत आणि गरीब राष्ट्रांतील दरी वाढत चालली आहे. आणि यामुळेच जागतिकीकरण म्हणजे नववसाहतवाद असे समीकरण रूढ झाले आहे.
राजा : वा ! जोरात चाललंय अगदी !
रूपक : त्यात कसलं जोरात !
राजा : कितीचं टार्गेट? नव्वद की पंच्चाण्णव?
रूपक : काय चेष्टा करतोहेस काका...
राजा : हे बघ, योग्य वेळी योग्य गोष्टी ठरवलेल्या बऱ्या, अंधारात चाचपडत राहिलास तर आमच्यासारखी गत व्हायची ! बॅचलर ऑफ ड्रॅमॅटिक्स करून घरोघरी फिरत राहावं लागेल !
रूपक : तू काय व्हायचं ठरवलं होतंस?

राजा : माझीच विकेट काढायला लागलास तू? अरे आम्हाला असं विचारणारं कोणी नव्हतं घरात. नुसत्या उनाडक्या करत बसलो. जेमतेम पास झालो. कुठंच ॲडमिशन मिळत नाही म्हणताना 'बॅचलर ऑफ ड्रॅमॅटिक्स'ला घेतली शेवटी. आमच्याकडे ज्यांना कमी मार्क्स मिळतात त्यांनी ड्रामा डिपार्टमेंटला ॲडमिशन घेण्याची पद्धत आहे. मराठवाड्यात प्रत्येक घरात तुला असा एक बॅचलर ऑफ ड्रॅमॅटिक्स सापडेल.

रूपक : अरे पण तुझ्या आवडीचं क्षेत्र नाही का हे?

राजा : भिकेचे डोहाळे आहेत ते. तुला समजणार नाही. तू आपला तुझं ते डॉक्टर नाहीतर इंजिनिअर, एवढं सांभाळ म्हणजे झालं...

रूपक : काका, तू बाबांना सांगशील जरा?

राजा : काय सांगू?

रूपक : सतत अभ्यास करायचा कंटाळा येतो रे!

राजा : हे एवढं वर्ष तरी सुटका नाही!

रूपक : अरे पण टी.व्ही.बंद, रेडिओ बंद, खेळायला पण जाऊ देत नाहीत, म्हणजे काय?

राजा : काय चुकतंय त्यांचं? प्रत्येक आई-बापाला असंच वाटतं की आपल्या मुलानं भरपूर अभ्यास करावा, नाव मिळवावं... मोठं व्हावं...

रूपक : तू पण त्यातलाच. ( "अभ्यासाला दुसरा काही पर्याय नाही, चालू दे पुढं" असं म्हणत रूपकच्या पाठीवर थाप मारून बाहेर येतो. रूपक पुस्तकात तोंड खुपसून तोच परिच्छेद पुन्हा वाचू लागतो. वाचता वाचता हळूच खोलीच्या दाराशी येऊन बाहेरचा कानोसा घेत उभा)

राजा : तर शेक्सपिअर, मी चाललो, आचरेकरांना सांगतो जमत नाही, दुसरा लेखक बघा म्हणून!

त्रिलोक : (एकदम) मुलगा आई-बापाला भारतातच सोडून लंडनमध्ये स्थायिक होतो असं दाखवतोय शेवटी... परत येतच नाही तो!

राजा : (थांबत) असं, कर... मुलाचं लग्न तिकडंच लंडनमधल्या एखाद्या गोऱ्या मुलीशी झालेलं दाखव. आई-बापाच्या पाया पडण्यासाठी तो बायकोला घेऊन भारतात येतो आणि जेवायलासुद्धा न थांबता लगेच निघून जातो असं दाखवायचं... आई-वडलांचं दु:ख यामुळं अधिक गडद होईल आणि प्रेक्षकांनापण चांगलीच हळहळ वाटेल...

रूपक : (बाहेर येत उत्साहानं) बाबा, त्या पेक्षा तो मुलगा लंडनमधली नोकरी सोडून भारतातच स्थायिक व्हायला येतो असं का दाखवत नाही तुम्ही?

त्रिलोक : आलास तू? तुला काय कळतंय त्यातलं?

रूपक : सगळ्या मुलांना वाटतं की आई-वड्लांजवळ राहावं आपण म्हणून !

त्रिलोक : अंड्यात आहेस तू अजून. बायको आली की लगेच लाथा घालायला लागशील आई-बापाला! आणि परदेशात जायची वेळ येईल ना तेव्हा कळेल तुला आई-बाप ही कशी अडगळ असते ते! काही अडलं तरच बाहेर ये असं सांगितलं होतं ना तुला?

रूपक : अडलंय म्हणूनच आलोय.

त्रिलोक : काय अडलंय ?

रूपक : (वहीत पाहात) चंगळवाद आणि मानवीमूल्यांचा ऱ्हास यातील संबंध स्पष्ट करा ! त्रिलोक : (विचार करत) चंगळवाद... मानवी मूल्य? (काही सुचत नाही) हे बघ, एवढा आमचा शेवट फायनल  होऊ दे नाटकाचा मग सांगतो मी तुला समजावून, पंधरा मिनिटांनी ये !

रूपक : (वहीत पाहत) बरं मग 'अपृष्ठवंशीय प्राणी' या शब्दात किती जोडाक्षरं आहेत हे सांगा!

त्रिलोक : काय काय?

रूपक : अपृष्ठवंशीय प्राणी... या शब्दात किती जोडाक्षरं आहेत; एवढं सांगा मग जातो लगेच.

त्रिलोक : चॅयला, पाच मिनिटांची शांतता नाही... (बोटावर मोजत) अ पृ ष्ठ वं शी य... आता  बघ, (विचारात) अं... (राजाला) पृ हे जोडाक्षर आहे का रे?

राजा : (तोही गोंधळलेला) ष्ठ हे तर उघड उघड जोडाक्षर आहे पण प्राणी मधलं प्र हे जोडाक्षर मानायचं  का नाही, नक्की काही कळत नाही... (त्रिलोकला) चॅयला, याला तू  इंग्रजी मीडियममध्ये का घातलं नाहीस? निदान असल्या शंका तरी विचारल्या नसत्या. त्रिलोक : हे चांगलं आहे तुझं !

राजा : काय खोटंय त्यात? हल्ली लोक आपल्या मुलांना इंग्रजी मीडियमच्या  शाळेत टाकतात याचं कारण त्यांचं इंग्रजीप्रेम हे नसून मराठी भाषेच्या अज्ञानाची भीती हेच अधिक असतं!

रूपक : तुम्ही म्हणता ना तुमच्या भाषा चांगल्या आहेत म्हणून?

त्रिलोक : बरं... बरं... जास्त अक्कल पाजळू नको. (विचार करत) अपृष्ठवंशीय प्राणी... म्हणजे बघ... (मोजत) एक... दोन... (राजाला) काय रे किती जोडाक्षरं आहेत तुझ्या दृष्टीनं?

राजा : अ... पृ... प्र... ष्ठ... (गोंधळून, पराभूत होत...) आमच्याकडं मराठवाड्यात  शिक्षणाचा स्तर तसा साधारणच रे! आणि शिक्षक कुठले चांगले मिळालेत आम्हाला? नेमकं काही सांगता येत नाही बाबा आपल्याला. हां, दिग्दर्शनातल्या  खाचाखोचा विचार...

त्रिलोक : (पराभूत होत) जारे जा, आईला विचार, च्चल, जा आत! (रूपक पाय आपटत जातो.)

राजा : (पुन्हा मुद्यावर येत) मग लंडनवरनं त्या मुलाला तू पुन्हा भारतात...

त्रिलोक : स्पष्ट बोलायचं तर मला त्याची काही गरज वाटत नाही. वाटल्यास तिकडंच त्याचं लग्न झालेलं दाखवू, पण परत येत नाही एवढं नक्की. आजकाल ह्या पोरांना आई-बापाची किंमतच राहिलेली नाही, आणि तसंही भारतात आहे काय त्यांच्यासाठी ठेवलेलं?

राजा : बरं, ओके... ओके... मी बघतो आचरेकरांशी बोलून. (ऑर्डर दिल्यागत) पण पहिल्या अंकाच्या  शेवटी एक गाणं टाकायचंय!

त्रिलोक : गाणं? नाही, मला अजिबात जमणार नाही. (हस्तलिखित आपटून उठत) आय  ॲम सॉरी ! विषय संपला !

राजा : म्हणून तर तुझी नाटकं व्यावसायिकला येत नाहीत. सांगितलं ना की, शेवटी मनोरंजन हा एक  महत्वाचा मुद्दा असतो!

त्रिलोक : शेवटी! पण तो पहिल्या क्रमांकावर आलाय आता. जो उठतो तो वाट्टेल तसा धांगडधिंगा घालीत सुटतो, याला नाटक म्हणतोस तू?

राजा : हा एक व्यवसाय आहे हे विसरू नको तू... निर्माते पैसा गुंतवतात त्यात. डोअरकीपरपासून निर्मात्यांपर्यंत सर्वांचं पोट असतं त्यावर...

त्रिलोक : अरे पण कथेची गरज नसतांना गाणं लिहू? त्या मुलाचे दु:खी आई-बाप गाणं म्हणत बागेत पकडा-पकडीचा खेळ खेळताहेत असं दाखवू? एवढी भयंकर तडजोड करू शकत नाही मी, सॉरी!

राजा : अरे असं काय करतोहेस? खाडिलकर- गडकऱ्यांपासून पुलं-अत्र्यांपर्यंत अनेक मोठमोठ्या लेखकांनी केल्यात अशा तडजोडी...

त्रिलोक : केल्या असतील, मला नाही जमत! (उसळून) गेल्या दोन वर्षात पाच नाटकं दिली. आहे का कोणाची हिंमत एवढं लिहिण्याची? एक निर्माता म्हणतो नाटक स्त्रीपात्र विरहीत नको, म्हणून एक बाई टाकून लिहिलं, दुसरा म्हणतो एकच बाई नको, दौऱ्यावर तिच्या सोबतीसाठी दुसरी हवी. एका निर्मात्याला पात्रं कमी वाटली, एकाला जास्त वाटली. एकाला एकच सेट हवा होता तर दुसऱ्याला सेटची काहीच बंधन नको होती. एकाला गंभीर विषय नको होता तर एकाला विनोदी नाटक नको होतं, एकाला नाटकात प्रॉब्लेम नको होता तर दुसऱ्याला प्रेक्षकांना गुंतवून ठेवणारा प्रॉब्लेम हवा होता. एकाला नाटकाचा निष्कर्ष काढून हवा होता तर एकाला निष्कर्ष प्रेक्षकांवर सोपवायचा होता. व्हॉटीज, धिस? लेखकाची चेष्टा आहे ही! मला तर अगदी बाजारात उभं राहिल्यासारखं वाटायला लागलंय...

राजा : ट्राय टू अण्डरस्टँड मी. प्लीज... सगळ्याच नाटककारांना या मन:स्थितीतून जावं लागतं. पण एकदा का तू व्यावसायिक यशाची चव चाखलीस की मग यातली गंमत लक्षात येईल तुझ्या ! इतकं लिहिलंस, अजून थोडासा जोर लाव... यश तुझंच आहे मग.

त्रिलोक : (राजी होत) पण काही झालं तरी गाणं लिहिणार नाही एवढं नक्की, आणि आता हे सुद्धा शेवटचं, आणि ते पण फक्त तुझ्यासाठी!

राजा : शेवटचं? अगदी मनापासून बोलतोयस?

त्रिलोक : (हलकं संगीत) पकडलंस तू मला बरोबर. मी नेहमी म्हणतो की हे शेवटचं... पण ते संपायच्या आतच दुसरा विषय सुरू झालेला असतो. लेखन हे सुद्धा एक व्यसनच रे! लेखक त्यात कितीही ठेचकाळला, होरपळला, तोंडावर आपटला तरी तो न थांबता पुढं पुढंच जात राहतो. त्यामुळं शेवटचं नाटक हे शब्द परत घेतो. शेक्सपिअरनं छत्तीस नाटकं लिहिली. मी सदतीस लिहिल्याशिवाय मरत नाही!

राजा : शाब्बास ! आता कसं बोललास? फक्त एक लक्षात ठेवायचं...

त्रिलोक : काय?

राजा : कथानक वेगळं पाहिजे, प्लॉट मजबूत हवा, व्यक्तीरेखा तगड्या पाहिजेत, संवाद चुरचुरीत, खटकेबाज, शौलीदार असायला हवेत. हासू आणि आसू याचं योग्य प्रमाणात मिश्रण असायला हवं... आणि सर्वांत महत्त्वाचं म्हणजे पहिल्या रांगेपासून शेवटच्या रांगेपर्यंत सर्वच प्रेक्षकांना धरून ठेवण्याची ताकद पाहिजे त्यात!

त्रिलोक : हॉटेलात जाऊन ऑर्डर देतात तसं सांगतोयस. 'पानी कम, मलाई मारके' !

राजा : काय बोललास यार! टाळी दे. व्यावसायिक नाटकाची व्याख्याच केलीस तू अगदी! हल्लीच्या प्रेक्षकांना अगदी असंच नाटक पाहिजे, पानी कम, मलाई मारके... अगदी असंच लिहायचं... तुझ्यात आहे ती ताकद! कमॉन यार... उत्तिष्ठित... जाग्रत...

त्रिलोक : माझा विकपॉइंट बरोबर माहिताय तुला!

राजा : माझे शब्द लिहून ठेव... महाराष्ट्राचा शेक्सपिअर म्हणून जगाला ओळख होणार आहे एक दिवस तुझी!

त्रिलोक : (प्रोत्साहित होऊन, स्वत:वरच खूष होत, गद्य लयीत म्हणू लागतो. प्रकाश बदलतो. संगीत.)

जन्मा घालीन आणि वाढवीन माझे विश्व निरंतर
रंगभूमीच्या चरणांवरती वाहीन अक्षर अक्षर
मी तर शब्दसृष्टीचा ईश्वर...
शब्दशिल्प मी घडवीन ऐसे पिढ्यापिढ्याना ठरेल प्रेरक
दीपस्तंभासम दिशा दाखवील रंगभूमीला ठरेल तारक
रसिकजनांची करीन सेवा, जिवंत ठेवीन आतले पाझर
मी तर शब्दसृष्टीचा ईश्वर...
दाही दिशांना पुरून माझी उरेल ऐसी कीर्ति
नावच माझे नव्या लेखकां देईल मोठी स्फूर्ती
अंधाराला पळवून लावीन उजळीत अंतर अंतर
मी तर शब्दसृष्टीचा ईश्वर...
वौभवशाली भुतकाळाचा असे वारसा मला
क्षणाक्षणाची मोजीन किंमत घडवीन भवितव्याला
अभंग लेणी कलाकृतींची कोरील अक्षर अक्षर
मी तर शब्दसृष्टीचा ईश्वर...

(गाणं सुरू असताना रूपक स्वयंपाकघरातून बाहेर येऊन पाहात आहे. वाटीतले शेंगदाणे तो एकेक करून खात आहे. प्रतिभा चहा घेऊन येते. गाणं संपता संपता फोन वाजतो. कप राजाच्या हातात देऊन प्रतिभा फोन उचलते.)

प्रतिभा : हॅलो SSS, नमस्कार... हो, आहेत... आपण कोण ? हो, हो देते, देते... (फोनवर हात ठेवून) अहो तुमच्या पाटीलसाहेबांचा फोन आहे.

त्रिलोक : चॅयला काय कटकट आहे याची! घरीपण बसून देत नाही निवांतपणे हा... (अनिच्छेने फोन घेतो. मात्र फोनवर एकदम गाय झालेला.) नमस्कार साहेब! हो... हो... माहिताय, माहिताय... बरं... बरं... (का कू करत) पण मला साहेब ते..., पण... बरं... बघतो... प्रयत्न... बरं... नाही, म्हणजे त्याचं काय सर... ओ के... किती तारखेला आहे लग्न? काय नाव मुलीचं? बरं... बरं... आणि मुलाचं? बरं... बरं... ओके... नमस्ते सर ! (फोन ठेवत) च्यामायला ह्या साह्यबाच्या!

राजा : काय झालं रे?

त्रिलोक : सालं स्वत:ला चार ओळी लिहिण्याची अक्कल नाही... ह्याची पत्रं आम्ही लिहून द्यायची, अर्ज आम्ही लिहून द्यायचे, ह्याच्या नावानं बातम्या आम्ही लिहून द्यायच्या... पेप्रात ह्याचे फोटो आम्ही छापून आणायचे...

प्रतिभा : अहो पण ते तर नेहमीच करत आलात तुम्ही.

त्रिलोक : अगं पण आता हा आणखी नको नको ती कामं सांगायला लागला!

राजा : कोणतं काम सांगितलं आता?

त्रिलोक : (नाराजीने गप्प)

प्रतिभा : अहो पण काय सांगितलं तरी काय असं?

त्रिलोक : त्याच्या मुलीचं लग्न आहे...

प्रतिभा : मग?

त्रिलोक : तिच्या लग्नाच्या मंगलाष्टका लिहायला सांगतोय!
(राजा, प्रतिभा, रूपक हसतात)
त्रिलोक : ह्याच्या पोरीसाठी मंगलाष्टका लिहून देऊ? याच्या बापाचा नोकर आहे का मी ? शासनाचा पगार घेतो मी, याचा नाही! इतका स्वस्त वाटलो काय रे मी तुला? पोटापाण्यासाठी नोकरी करतो मी हे खरंय पण म्हणून काही माझी प्रतिभा गहाण टाकलेली नाही मी तुझ्याकडं! नाही देत जा! लाथ मारतो मी तुझ्या नोकरीवर! (प्रतिभाला) एकवेळ त्यानं मला मंत्रालयावरनं उडी मारायला सांगितलं असतं तरी मी ते केलं असतं. पण मुलीच्या लग्नाच्या मंगलाष्टका? (जणू बेबंदशाहीमधल्या संभाजीच्या भूमिकेत शिरतो.) सृष्टीची उलथा-पालथ तर झाली नाही ना, मुंग्यांनी मेरूपर्वत तर गिळला नाही ना? वडवानळानं समुद्र जाळला नाही ना? मग आम्हीच असे कमनशिबी कसे की समशेरीचे शिकंदर निपजून नालायकांची गत कपाळी यावी ! राजकारणातल्या दर्यांतला हा सीधा दर्यावर्दी असा बेआब्रूने रसातळाला का जावा? ह्या मायावी जगात विजयी चारित्र्य, सुखाचा मृत्यू लाभणे सीधेपणापेक्षा भाग्यावर अवलंबून असेल का? जीवा का तळमळतोस आता? मनाचा मानी, माथ्याचा संतापी, क्रूर कर्दनकाळ तू! तब्बेतीनं सीधा असलास तरी अकलेने आडदांड निपजलास! माणसांची पारख चुकलास! संगतीची निवड हुकलास! भले भरडलेस, खोटे कंठी धरलेस! कालचक्राला क्षमा मंजूर नाही. देहांताची सजा तुला फर्मावली जात आहे. मर, धर्मांतर नको असेल तर दुस्मानांच्या दारी कुत्र्याच्या मोताने मर! (स्वत:चा संवाद घालत) पोट जाळायचं असेल तर आपली प्रतिभा गहाण टाक! खत्रूड साहेबाच्या फडतूस मुलीसाठी मंगलाष्टका लिहून दे!
(डोक्याला हात लावून बसतो)
प्रतिभा : शांत व्हा! उगाच डोक्यात राख घालून घेऊ नका.
त्रिलोक : अगं काय शांत होऊ? तुला माहीत नाही ही मंत्रालयातली वरिष्ठ नावाची जमात कसं रक्त शोषते ती! जळवा परवडल्या त्यांच्यापेक्षा. पोट भरलं की जळवा सुटतात पण ह्यांची पोटं भरतच नाहीत कधी.
प्रतिभा : मग काय म्हणणं आहे तुमचं?
त्रिलोक : जोवर नोकरी सोडत नाय तोवर माणसात येणार नाही अशी अगदी खात्रीच झालीय माझी.
प्रतिभा : एक तारखेला पगार मिळाला नाही तर कशी ओढाताण होते आपली माहिताय ना? हा दहावीत आहे अजून, त्याचं पुढचं शिक्षण, नोकरी, लग्न... कसं होणार सगळं? मला नोकरी होती चांगली ती सोडायला लावलीत तुम्ही! नोकरी सोडून खाणार काय? जाणार कुठं? राहणार कुठं?
त्रिलोक : (राजाला) हे आणखी एक दु:ख– घराचं! सरकारपण असं चमत्कारिक आहे की रस्तोरस्ती झोपड्या टाकणाऱ्यांना दोन-चार वर्षांत घरं देतं पण आम्ही इथं वीस वीस वर्ष राहतोय तर साधी झोपडीपण मिळू देत नाही आम्हाला.
राजा : (त्याची गंमत करत) कुणी घर देता का घर?
एका तुफानाला कुणी घर देता का घर?
एक तुफान भिंतीवाचून छपरावाचून
माणसाच्या मायेवाचून देवाच्या दयेवाचून
जंगला जंगलात हिंडत आहे
जेथून कोणी उठवणार नाही
अशी जागा धुंडत आहे

कुणी घर देता का घर?
(मोठ्यानं हा हा हा करून हसतो)
त्रिलोक : (स्वत:चे संवाद घालत पुढे...)
खरंच सांगतो, बाबांनो
मुंबईत एक घर हवंय
छपराशिवाय जगणं इथलं
अगदी अशक्य झालंय...
सरकारच्या या कॉर्टरमध्ये
दोन खोल्यांच्या खुराड्यामध्ये
श्वास गुदमरून गुदमरून
धीर आता खचला आहे
धडपडत, धडपडत जगत आहे
चाचपडत चाचपडत चालत आहे
खरं सांगतो बाबांनो
एकीकडं लेखन आणि दुसरीकडं नोकरी
यांच्या कैचित अडकलो आहे
कुणी घर देता का घर!
टॉवरमधलं नको, पेन्ट हाऊस नको
पेडररोडचा अलिशान फ्लॅट नको
एक हवं वन रुम किचन
जुनं चालेल, पागडीचं चालेल
चाळीतलं चालेल, गल्लीतलं चालेल
लागलीच लॉटरी तर म्हाडाचं चालेल
पण एक हवं साधं घर
मालकीचं म्हणून सांगण्यासाठी
एक हवं फोल्डिगचं टेबल
आरामात बसून लिहिण्यासाठी
प्रतिभा : आणि विसरू नका बाबानो,
एक हवा पोटमाळा
नाटकांची रद्दी साठवण्यासाठी...
राजा : सरकार, सरकार, सरकार ! (सगळे हसतात.)
रूपक : बाबा sss
त्रिलोक : तू आता आणखी काही लिहायला सांगू नको. गोठून गेल्यासारखं वाटतंय अगदी.
रूपक : (वहीत पाहात) शून्य अंश तपमानात पाण्याचा बर्फ होतो, बरोबर ?

त्रिलोक : बरोबर !

रूपक : पण तपमान जर त्यापेक्षा आणखी खाली गेलं, म्हणजे ‘वजा चार अंश’ झालं म्हणजे ‘मायनस फोर...’ तर बर्फाचं पुन्हा पाणी होतं–

त्रिलोक : काय म्हणतोस?

रूपक : हो ना, आणि त्यामुळंच बर्फाळ प्रदेशातले मासे आणि पाणवनस्पती बर्फाच्या खालीसुद्धा जिवंत राहतात.

त्रिलोक : अरे काय असं कोड्यात बोलतोयस?

रूपक : यालाच ‘ॲनॉमलस बिहेविअर ऑफ द वॉटर’ असं म्हणतात.

त्रिलोक : (स्वत:शी) शून्य अंशाला बर्फ... त्यापेक्षा आणखी चार अंश खाली गेलं की पुन्हा पाणी? चॉयला चमत्कारिकच आहे... (उघडपणे) पण तुला म्हणायचंय काय नक्की?

रूपक : बारा नाटकं लिहिल्यानंतर आता तुम्हाला गोठून गेल्यासारखं वाटत असेल, तर थोडे आणखी कष्ट करा. तपमान शून्याच्याही खाली आणखी चार अंशानी गेलं तर पुन्हा बर्फाचं पाणी होतं, तसं थोडे अधिक कष्ट घेतलेत तर अधिक चांगलं नाटक लिहू शकाल तुम्ही ! नाटक चाललं की घरही विकत घेता येईल आपोआप...

राजा : वा, वा ! क्या बात है ! क्या बात है !

रूपक : (राजाला) मला शाळेसाठी एकांकिका लिहून हवीय म्हणून सांगतोय हे मी बाबांना!

राजा : (रूपकला) ए बाबा, आधी माझं नाटक लिहून होऊ दे... तो आचरेकर बोंबलतोय तिकडं... आणि तुला सांगितलं ना मघाशी... यंदा फक्त अभ्यास... चल् पळ! (रूपकला चापटी मारतो. तो नाराजीने आपल्या खोलीत जातो.)

त्रिलोक : (स्वत:शी निर्धार करत) तू असं कर, रविवारी संध्याकाळी ये आणि नाटक घेऊन जा... (प्रतिभाला) तू अभ्यास घे रूपकचा. मी बघतो कसं काय पुन्हा लिहायचं ते!

राजा : पण रविवारचं अगदी नक्की ना?

त्रिलोक : अगदी शंभर टक्के. (प्रतिभा रूपकच्या खोलीत जायला निघते)

राजा : (तिला अडवत) वैनी, जरा दोनशे रुपये हवे होते...

प्रतिभा : (त्रिलोककडे सहेतूक कटाक्ष टाकत पर्समधून शंभराच्या दोन नोटा काढून देत) आज जेवायला थांबत नाही का?

राजा : साहित्य संघात एकांकिका स्पर्धा आहेत. तिकडं परीक्षक म्हणून बोलवलंय... तिकडंच जेवण आहे. मानधन मिळालं की करतो पैसे परत... काळजी करू नका... (पैसे घेत, त्रिलोकला) पण आता मात्र रविवार म्हणजे रविवार. जास्त वेळ लावू नको... चल्... बाऽऽऽय... (चपला घालून जातो. प्रतिभा रूपकच्या खोलीत जाते. त्रिलोक विचारमग्न स्थितीत पेन हातात घेऊन फेऱ्या मारू लागतो. डोकं खाजवतो. एखादं जाडजूड पुस्तक उचलून चाळू लागतो.)

प्रतिभा : (रूपकला त्याच्या खोलीत) कोणता विषय घेऊ या?

रूपक : हा निबंध जरा तपासून देतेस का? शुद्धलेखन थोडं जरी चुकलं तरी मार्क कापतात गुरवमॅडम...

प्रतिभा : बघू बरं, कोणत्या विषयावर लिहिलायंस?

रूपक : पावसाळ्यातील एक दिवस!

प्रतिभा : (वही हातात घेऊन वाचत) खरं तर मला निबंधातलं काही कळत नाही. बाबांनाच विचारूया आपण... (तेथूनच ओरडत) अहो ऽऽऽ ऐकलंत का? अहो ऽऽऽ

त्रिलोक : (बाहेरूनच) काय झालं? कशाला बोंबलतेस?

प्रतिभा : अहो हा निबंध तपासून देताय का जरा?

त्रिलोक : काय म्हणालीस?

प्रतिभा : (ओरडत) निबंध तपासून द्या जरा!

त्रिलोक : (हातातले कागद आपटत) चॅयला, मला लिहून द्यायचं नाही असा चंगच बांधलाय सगळ्यांनी! (तिकडं जात) काय झालं? काय पाहिजे?

प्रतिभा : हा याचा निबंध... जरा तपासून द्या नीट...

त्रिलोक : बघू (हातात कागद घेऊन निबंध चांगला नसणार असं आधीच गृहित धरून उपहास करत तिरकसपणे वाचू लागतो.) मला पावसाळा अतिशय आवडतो कारण त्यामुळे रस्त्यात पाणी तुंबून शाळेला सुट्टी मिळते... (जळजळीत नजरेनं रूपककडे पाहात) पाण्यातून ये जा करणारी माणसं आणि अडकलेल्या गाड्या पाहताना आनंद वाटतो. पाऊस कधी कधी असा कोसळतो की रेनकोट किंवा छत्रीचा काहीच उपयोग होत नाही. अशा भिजलेल्या स्थितीतही माणसं ये-जा करताना दिसतात. त्यांचं कौतुक वाटतं. मध्येच ऊन पडलं की मुलं बाहेर पडून रस्त्यावर क्रिकेट खेळताना दिसतात. क्रिकेटचा खेळ आपल्याकडे किती लोकप्रिय आहे हेही यामुळं लक्षात येतं. (प्रतिभाकडे पाहतो) पाणी तुंबल्यामुळे माणसं उत्स्फूर्तपणे एकमेकांना मदत करतात त्यामुळे सामाजिक एकात्मता निर्माण होते. सरकारी मदत-यंत्रणा यावेळी कोठे गायब होते हे कळत नाही. ठिकठिकाणी तुंबलेलं पाणी दाखवत दूरदर्शनच्या वाहिन्यांचे प्रतिनिधी लाईव्ह चित्रीकरण करताना दिसतात. त्यांच्यामुळे पावसाची वेगवेगळी रूपं लोकांना घरबसल्या बघायला मिळतात. दूरदर्शन हे लोकशिक्षणाचे माध्यम कसे आहे तेही यामुळे लक्षात येते. (स्वत:वर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न करत) हा निबंध आहे? निबंध आहे हा? एका नाटककाराचा मुलगा तू! (ओरडत) अशानं लाज आणशील मला!

प्रतिभा : अहो पण काय ते समजावून सांगा ना नीट! ओरडताय कशाला?

त्रिलोक : हा निबंध आहे का? त्याला ना धड प्रारंभ, ना मध्य, ना चांगला शेवट... आणि भाषाशौली काय तुझी? वा ! (पश्चातापानं मान हलवत) घरात इतकी पुस्तकं पडलीत, गडकऱ्यापासून शिरवाडकरांपर्यंत, बालकवींपासून करंदीकरांपर्यंत! काय उपयोग आहे?

प्रतिभा : अहो पण दिवसभर शाळेत असतो तो... कधी वाचणार एवढी पुस्तकं? आणि शिक्षकांनी शिकवायला नको नीट?

त्रिलोक : पण मी म्हणतो आपण आपल्या भाषेवर आपण मेहेनत घ्यायला नको? अरे भाषा कमवावी लागते गडकरी-खाडिलकरांसारखी, शिरवाडकरांसारखी! पुण्यप्रभावमधील गडकऱ्यांचा नायक काय म्हणतो ऐक! (आवेशानं म्हणून दाखवत) "खऱ्या सुखाच्या निराशेनंतर हे कशाचे सुख आणि कशाचे समाधान! गजान्तलक्ष्मीच्या राजवैभवात मिरवणूक काढण्यासाठी आणलेल्या हत्तीच्या मढ्यावर हस्तिदंती सामानाचे दुकान काढण्याचा प्रसंग आला तर त्यात समाधान कोण मानील? पिकास आलेल्या क्षेत्रभागावर तरंगणाऱ्या मेघापासून कृषीवलाने जीवनाची आशा करावी आणि शेवटी वृष्टी केल्यावाचून मेघ निघून गेल्यावर, निदान त्याच्यापासून क्षणभर छाया मिळाली म्हणून समाधान मानावे तशातला हा प्रकार नाही का? वसुंधरे, तुझ्यासारख्या त्रिभुवनदेवतेला सावधिक

संसाराच्या साम्राज्यात राणी केल्यानंतर, या उपमर्दाबद्दल तिच्या दिव्यपदाची भरपाई करून देण्यासाठी उत्साहाने लहानपणापासून कमावीत आणलेली बुद्धिमत्ता, मानसशक्ती आणि बाहुबल आता एखाद्या सजीव बाहुलीला सजविण्यासाठी खर्च करीत बसू आणि त्यात सर्वस्वाचे सार्थक मानू? वसुंधरे, अमर्याद इच्छा करणाऱ्या निराश मनाला, मर्यादित सुखप्राप्तीपेक्षा सर्वस्वाच्या सत्यानाशानेच अधिक समाधान वाटते...”

(थोडी शांतता)

प्रतिभा : असा निबंध लिहिला तर गडकरीसुद्धा नापास होतील आजच्या जमान्यात.

त्रिलोक : मी चाललो. तुम्हाला काय करायचंय ते करा.

प्रतिभा : तुम्हाला काही इंटरेस्ट नाही याच्या अभ्यासात. तुमच्या डोक्यात नाटक भरलंय नुसतं, दुसरं काहीही दिसत नाही तुम्हाला... जा आणि बसा लिहित! जा! (रूपकला) रूपक जरा ते गाईड काढ मराठीचं...

त्रिलोक : गाईड? लेखक बाप आणि तोही मराठीचा. तो जिवंत असताना त्याच्या मुलानं मराठीचा अभ्यास गाईडमधनं करावा यापेक्षा दैवदुर्विलास तो दुसरा काय!

प्रतिभा : नुसते डायलॉग मारू नका तुम्ही, जा तुमच्या कामाला... मी आहेच नाटकाच्या झेरॉक्स काढून द्यायला.

(त्रिलोक बाहेर येऊन अस्वस्थपणे येरझारा घालू लागतो. एखाद्या जाडजूड पुस्तकांत संदर्भ शोधतो, काही वाक्ये लिहून कागद फाडून टाकतो.

हळूहळू अंधार. रात्र. एकीकडे टेबल लॅम्पच्या प्रकाशात रूपक आणि प्रतिभा अभ्यास करीत आहेत, तर दुसरीकडे त्रिलोकची लेखनाशी झटापट सुरू आहे. अखेर त्याला सूर सापडतो आणि तो शांतपणे लिहू लागतो. आता फक्त घड्याळाची टिक् टिक् सुरू आहे. फोन वाजतो.)

त्रिलोक : (फोन घेतो. आता तो शांत, प्रेमळ) हॅलो ऽऽऽ कोण बोलतंय? कोण?

फोन : गोव्यावरून प्रसाद नाईक बोलतोय मी...

त्रिलोक : हो... हो... ओळखलं, बोला!

फोन : या वर्षी स्पर्धेसाठी तुमचं नाटक द्या आम्हाला... नाही म्हणू नका, गेली तीन वर्ष तुमची नाटकं करतोय आम्ही, बक्षिसं घेतोय. तुमचा एक मोठा प्रेक्षकवर्ग तयार झालाय गोव्यात. तुमचं नाव पाहून गर्दी करतात लोक... प्लीज निराश करू नका आम्हाला... आमची संस्था खूप गरीब आहे... आम्ही स्वत:चे पैसे काढून नाटक करतो... तुमचं मानधन नक्की देऊ आम्ही... प्लीज सर... तुमच्यासारख्या लेखकांनी लिहिलं नाही, चांगली नाटकं जर आली नाहीत तर आपण आपल्याच हातांनी रंगभूमीचा मुडदा पाडल्यासारखं होईल... आम्ही फार अपेक्षेनं बघतोय तुमच्याकडे! प्लीज... पाठवाल ना! (त्या प्रामाणिक शब्दांनी त्रिलोक गहिवरून येतो. हलके हलके फोन खाली घेत पिनवर ठेवतो. संगीत. अंधार.)

अंक पहिला / प्रवेश दुसरा.

(स्थळ : तेच. प्रकाश. आठ दिवस उलटले आहेत. रविवार. घरात फक्त त्रिलोक आणि प्रतिभा. रूपक क्लासला गेलेला आहे. प्रतिभा स्वयंपाकघरात कांदेपोहे करत आहे. त्रिलोकला ‘नव्या युगाची आशा’ या नाटकाची संहिता सापडत नाही. तो अस्वस्थपणे शोध घेत आहे. इकडंची पुस्तकं तिकडं, तिकडच्या वह्या इकडं अशी त्याची

उपसा-उपस सुरू आहे. हे चालू असताना त्याची बडबडही सुरू. हळूहळू त्याची अस्वस्थता वाढत जाते आणि शेवटी उद्रेकच होतो.)

त्रिलोक : एक कागद जागेवर सापडेल तर शपथ. गेली कुठं स्क्रिप्ट माझी? इथंच तर ठेवली होती. प्रतिभाऽऽऽ एऽऽऽ प्रतिभाऽऽऽ

प्रतिभा : (आतूनच आलेऽऽऽ आलेऽऽऽ असं म्हणते पण अजूनही ती बाहेर आलेली नाही)

त्रिलोक : (ओरडत) अगं माझं स्क्रिप्ट कुठाय नवीन नाटकाचं? इथं ठेवलं होतं, गेलं कुठं? ऐकू आलं का तुला? अगं स्क्रिप्ट कुठाय माझ्या नवीन नाटकाचं? कान बहिरे झाले का तुझे ?

प्रतिभा : (हात पुसत बाहेर येते) आले, आले... काय झालं ओरडायला? पोहे फोडणीला घालत होते तोवर धीर निघत नव्हता का?

त्रिलोक : खड्ड्यात गेले तुझे पोहे, 'नव्या युगाची आशा' या नाटकाची स्क्रिप्ट ठेवली होती इथं ती गेली कुठं?

प्रतिभा : कुठं ठेवली होती नेमकी?

त्रिलोक : इथंच तर होती...

प्रतिभा : (पाहात) नेहमीचं आहे तुमचं... एक वस्तू कधी जागेवर सापडत नाही! कधी ठेवली होती?

त्रिलोक : बुधवारी रात्रभर लिहित नव्हतो मी? शुक्रवार- शनिवार वेळ मिळणार नाही म्हणून राहिलेला भाग रविवारी पूर्ण करू असं ठरवलं होतं. आज राजाला बोलवलंय, माहिताय ना?

प्रतिभा : (तीसुद्धा शोध घेऊ लागते) नीट बघा जरा असेल इथंच कुठेतरी...

त्रिलोक : तुला किती वेळा सांगितलं की माझ्या कागदांना हात लावायचा नाही म्हणून!

प्रतिभा : मी कागद हलवले नाहीत तुमचे. पसारा इतका करून ठेवता की मला आवरावं लागतं सगळं...

त्रिलोक : कोण आवरून ठेवायला सांगत? घर म्हणजे काही फाईव्ह स्टार हॉटेल नाही, सारखं स्वच्छ ठेवायला... (कागदपत्रं इकडं-तिकडं फेकत) मला काही लाज वाटत नाही पसारा झाला म्हणून! पसाऱ्याशिवाय कसलं आलंय घर?

प्रतिभा : (रूपकच्या खोलीत जात तिकडे शोधाशोध करू लागते. करवादलेली.) नुसती पुस्तकं विकत आणायची आणि घरात थप्प्याच्या थप्प्या लावून ठेवायच्या! धूळ किती साठते याचा विचार नाही, का काही नाही... (एक गट्ठा भस्कन खाली पडतो त्यामुळे चिडते) श्शीऽऽऽ वाचायची नाहीत तर आणायची कशाला एवढी पुस्तकं?

त्रिलोक : तुला कळायचं नाही ते, एकेका पुस्तकासाठी वर्षवर्ष वाट बघितलीय, उपाशी राहिलोय, उसनवारी केलीय... तासन् तास पायपीट केलीय...

प्रतिभा : हे विश्वकोशाचे खंड आणून ठेवलेत, त्यांना हात लावलात का कधी? अर्धी खोली व्यापलेय त्यांनी... आणि वजनाला इतका भारी आहे एकेक की उचलवतसुद्धा नाही. पैसे वर आले असतील तर गोरगरिबांना वाटा म्हणावं अशी पुस्तकं काढण्यापेक्षा. (चिडून) नाही दिसत... आपली वस्तू आपण जाग्यावर ठेवायला नको ?

त्रिलोक : डोक्यात विचार असतात माझ्या काही ना काही... काय काय लक्षात ठेवू?

प्रतिभा : काय काम करता ते माहिताय, तासन् तास शून्यात तर नजर लावून बसलेले असता !

त्रिलोक : तुला कळायचं नाही कधी ते. कलावंत नुसता खिडकीतून बाहेर बघत असला तरी कामात असतो...

प्रतिभा : ह्हो ऽऽऽ आणि बायका कामात असल्या तरी रिकामटेकड्या असतात... पोह्यांना फोडणी घालेपर्यंत धीर निघाला नाही तुम्हाला!

त्रिलोक : तुझ्याशी बोलण्यात काही अर्थ नाही. रक्त आटवून लिहावं लागतं आम्हाला!

प्रतिभा : वा.शि.आपटे यांनी अनुवाद केलेले हे शेक्सपिअरच्या नाटकांचे खंड... किती वर्ष झाली, एकतरी नाटक वाचलंत का यातलं नीट? ही एवढी मोठी तुकारामाची गाथा! वाचलीत कधी ? शेक्सपिअर आणि तुकाराम दोघंही लोळतायत धुळीत!

त्रिलोक : तू माझ्या पुस्तकांना हात लावू नको, स्क्रिप्ट दिसतेय का नाही तेवढं बघ.

प्रतिभा : पुस्तकं कमी म्हणून की काय त्यात पेपरांची गर्दी. पाच-पाच वर्तमानपत्रं येतात घरात. एकच बातमी तर असते सगळीकडे मग कशाला घ्यायचे एवढे?

त्रिलोक : माझं डोकं फिरवू नको. सापडतंय का?

प्रतिभा : नाही सापडत, (स्टूलावर चढत) इथं वर बघते दिसतंय का कुठं ती !

त्रिलोक : अगं पण तिकडं जाईलच कशाला, मी इकडं ठेवलं होतं ते!

प्रतिभा : परवा अभ्यास घेत होता ना इकडं तुम्ही रूपकचा?

त्रिलोक : अग हो पण स्क्रिप्ट इकडंच ठेवली होती.

प्रतिभा : असं वाटतं सगळी पुस्तकं एकत्र करावी आणि काडी लावावी त्यांना.

त्रिलोक : (त्याला काही तरी आठवतं, संशय येतो. तो तिची उलट तपासणी घ्यावी त्या आवेशात) बाहेर ये प्रतिभा... (ओरडत) बाहेर ये !

प्रतिभा : (त्याचा रूद्रावतार पाहून पटकन बाहेर येते)

त्रिलोक : इथं उभी राहा.

प्रतिभा : (अचंबित होऊन उभी)

त्रिलोक : परवा मी इथं लिहित होतो तेव्हा दाराची बेल वाजली होती?

प्रतिभा : हजारदा वाजते !

त्रिलोक : विचारतो तेवढंच सांग !

प्रतिभा : वाजली होती !

त्रिलोक : (आठवण करून देत) नही नही... आज नही अगले हप्ते आना... गुरुवार शाम को...

प्रतिभा : काय म्हणायचय तुम्हाला?

त्रिलोक : रद्दीवाल्याला बोलावलं होतंस तू?

प्रतिभा : (गप्प)

त्रिलोक : तुझ्या डोळ्यात खुपतात माझी पुस्तकं, माझे पेपर... महिन्याच्या महिन्याला त्या भैय्याला बोलावून रद्दी घालतेस तू !

प्रतिभा : घालते ना, अजूनही घालणार... कुठं ठेवायचा तो पसारा?

त्रिलोक : परवा रद्दी दिलीस तू?

प्रतिभा : दिली !

त्रिलोक : मग गेलं माझं नाटक त्यातंच!

प्रतिभा : असं काय करताय, वेड लागलंय का मला?

त्रिलोक : यापूर्वी अनेकदा माझ्या वह्या, माझ्या नोट्स पसाऱ्याच्या नावाखाली रद्दीत दिल्यास तू.

प्रतिभा : वाट्टेल ते आरोप करू नका. मागच्या बाजूला काही लिहिलेलं असलं तर बसची तिकिटंसुद्धा जूपन ठेवलीत मी तुमची. मी कशाला रद्दीत टाकू तुमचं एवढं मोठं नाटक?

त्रिलोक : नुसते डायलॉग मारू नको. लग्नापूर्वी मी तुला इतकी सुंदर सुंदर पत्रं पाठवली, एक सो एक दुर्मिळ पुस्तकं पाठवली, इतक्या सुंदर कविता करून पाठवल्या. आहे का त्यातली एक तरी जागेवर?

: मग तुम्ही ठेवायचा ना!

: माझ्या कवितांचं चांगलं संकलन करून ठेवलं होतं, ती वहीसुद्धा हरवलीस तू ! काळजाचा लचका तोडून न्यावा कोणीतरी तसं वाटलं मला, ते कळलं तेव्हा.

प्रतिभा : आपल्याला शिस्त पाहिजे त्यासाठी.

त्रिलोक : तुला आहे ना, मग तू दाखव की ! (ती गप्प) लेखकाच्या मेहेनतीची किंमतच नाही तुम्हाला ! घरात तू आणि ऑफिसमध्ये तो पाटील! साल्यानं भंडावून सोडलंय मंगलाष्टकांसाठी.

प्रतिभा : साहेबाचा राग माझ्यावर काढू नका!

त्रिलोक : असं वाटतं राजीनामा द्यावा आणि मोकळं व्हावं... (उद्रेकानं) आणि ती वेळ लवकरच आणणार आहेस तू माझ्यावर!

प्रतिभा : नोकरी सोडून खायचं काय? माझी नोकरी होती ती सोडायला लावलीत !

त्रिलोक : सारखं काढून दाखवू नको, नोकरी सोडायला लावल्याचं... इथले पेपर्स तू रद्दीत दिलेस की नाही एवढं सांग !

प्रतिभा : दिले, सांगितलं ना आत्ताच !

त्रिलोक : त्या पेपरांच्या गठ्ठ्यातच कुठंतरी होती ती स्क्रिप्ट. गेली रद्दीत !

प्रतिभा : गेली असेल... मला माहीत नाही, माझ्यावर उगाच ओरडू नका. नोकर नाही मी तुमची!

त्रिलोक : प्रतिभा तुझं अती चाललंय...

प्रतिभा : मी नाही तुम्हीच करताय अती!

त्रिलोक : तू माझं नाटक रद्दीत दिलंस आणि मी अती करतोय?

प्रतिभा : मी ते रद्दीत दिलेलं नाही, आणि (निक्षून) नुसत्या झेरॉक्स काढून फुकटात वाटण्यापेक्षा रद्दीत निदान चार पैसे तरी मिळतात, हे लक्षात ठेवा!

त्रिलोक : (तिच्या तोंडात देत) ही माझी किंमत? ही? (काही क्षण शांतता.) परत दिसू दे तो भैय्या, उभा चिरून काढतो भडव्याला ! (तणाव. काही क्षणांनी दरवाजाची बेल वाजते. त्रिलोक जाऊन दार उघडतो. रूपक आलेला. त्याच्या पाठीला दप्तर. हातात वॉटर बॅग. आल्या आल्या तो दप्तर काढून दिवाणावर फेकतो. वॉटरबॅगमधील पाणी पीत दिवाणावर बसतो. घरातला तणाव त्याच्या लक्षात येतो. एवढ्यात फोन वाजतो. रूपक उठून फोन उचलतो)

रूपक : (फोनवर) हॅलोऽऽऽ कोण बोलतयं? कोण? बरं... कोण पाहिजे? हो... हो... बरोबर... एक मिनिट, फोनवर हात ठेवून बाबा, श्रीवर्धनवरनं ताम्हणकरांचा फोन आहे.

त्रिलोक : (रागातच) घरात नाहीत म्हणून सांग.

रूपक : (समंजसपणानं) थोड्या वेळानं कराल का प्लीज? बाबा जरा कामात आहेत महत्त्वाच्या. बरं... बरं... काही निरोप होता का? (शांतपणे ऐकत) बरं... बरं... बरं... बरं... सांगतो. सांगतो. थँक्यू. (फोन बंद करत) बाबा,

ताम्हणकरांनी एका दिवाळी अंकात नाटक वाचलं तुमचं, ‘बाई मिठाई'... म्हणाले खूप सुंदर लिहिलंय! महिलांवरील अन्यायाला वाचा फोडणारी अनेक नाटकं आली पण असं नाटक कधी पाहण्यात आलं नव्हतं असं म्हणाले !

त्रिलोक : (थोडा शांत होत) नंबर दिलाय का त्यांनी?

रूपक : नाही, पण फोन करतो म्हणाले पुन्हा. (प्रतिभाला) आई, मला खायला दे ना काहीतरी !

प्रतिभा : (त्याच्यावर खेकसत) हात दिलेत ना देवानं? आत जा आणि कांदेपोहे केलेत ते हादड!

रूपक : असं काय करतेस, दे ना... गुरवमॅडम एवढा अभ्यास देतात की त्राण राहात नाही अंगात, दे ना !

(प्रतिभा,त्रिलोक गप्प.) काय झालं बाबा, चिडलाय का असे?

त्रिलोक : अरे, हिनं माझ्या नव्या नाटकाचं हस्तलिखित रद्दीत दिलं !

रूपक : ‘नव्या युगाची आशा' ?

त्रिलोक : हो, इथं ठेवलं होतं परवा ...

रूपक : (घाई घाईनं दप्तर उघडून त्यातून हस्तलिखित काढून त्याच्या हातात देत) हे घ्या !

त्रिलोक : हे काय?

रूपक : ‘नव्या युगाची आशा’

त्रिलोक : तुझ्या दप्तरात कसं काय आलं हे?

रूपक : वह्या-पुस्तकं भरताना हे सुद्धा भरलं गेलं चुकून!

त्रिलोक : चॅयला तुझ्यासारखा चक्रम कार्टा बघितला नव्हता कुठं...

रूपक : कसला चक्रमपणा? परवा तुम्ही अभ्यास घेत होता माझा तेव्हा तिकडंच टाकून गेलात ते!

त्रिलोक : तू आधी आत जा आणि अभ्यासाला बस, माझं डोकं फिरवलंस तर काही खरं नाही तुझं...

(रूपक पाय आपटत त्याच्या खोलीत जातो. त्रिलोक अपराध्यागत प्रतिभाकडे पाहतो. ती गोठल्यासारखी जागीच बसून राहिलेली. दारावरची घंटा वाजते. त्रिलोक जाऊन दरवाजा उघडतो. राजा आलेला)

राजा : काय म्हणताय शेक्सपिअर? झालं का पूर्ण नाटक? आचरेकरांनी अल्टिमेटम दिलाय, आज मिळालं नाही तर दुसरा लेखक बघणार आहेत ते! (प्रतिभाला) भरपूर साखर घालून चहा करा वैनी... आणि हो, नंतर जेवूनच जाणार आहे ! (प्रतिभा शांत. त्रिलोक शांत. परिस्थितीचा अंदाज घेत राजा रूपकच्या खोलीत जात त्याला-) काय रे, खारे वारे आणि मतलई वारे यांची टक्कर झाली की काय आज?

रूपक : बरोबर ओळखलंस काका !

राजा : पण नेमकं काय झालं?

रूपक : बाबांचं स्क्रिप्ट सापडत नव्हतं.

राजा : कोणतं?

रूपक : नव्या युगाची आशा !

राजा : नकटीच्या लग्नाला सतराशे विघ्न!

रूपक : बाबांना वाटलं आईनं ते रद्दीत दिलं... भांडण झालं दोघांचं.

राजा : अरे ... पण सापडलं का नाही शेवटी?

रूपक : ते तर माझ्या दप्तरात होतं.

राजा : तुझ्या दप्तरात कसं काय आलं ते?

रूपक : वह्या-पुस्तकं भरताना चुकून भरलं गेलं. आत्ताच आलो मी तेव्हा दिला त्यांना ते काढून.

राजा : अच्छा, अच्छा... आलं लक्षात. म्हणून तोंड फुगवून बसलेत दोघंही? (बाहेरच्या खोलीत यायला निघतो. रूपक त्याला थांबवतो.)

रूपक : राजाकाका...

राजा : काय रे ?

रूपक : तुला एक सांगू का?

राजा : काय, काय?

रूपक : त्या नाटकाचा नायक आई-वडिलांना भारतात सोडून लंडनला राहण्याचा निर्णय घेतो ना?

राजा : हो बरोबर!

रूपक : तो शेवट बदला तुम्ही !

राजा : तुला काय कळतंय त्यातलं? अरे प्रेक्षकाची नुसती तडफड झाली पाहिजे...

रूपक : मुलगा आई-वडिलांजवळच राहतो असं दाखवलं तर त्यांना आनंद नाही का होणार? आनंद महत्त्वाचा नाही का?

राजा : माणसं आनंद घटाघटा पिऊन टाकतात आणि दु:ख हळूहळू चघळत राहतात. आपलं नाटक जर प्रेक्षकांनी लक्षात ठेवायला हवं असेल तर त्यांना तडफडत ठेवलं पाहिजे... जाऊ दे तुला कळणार नाही ते. चल् , तुझ्या अभ्यासाचं बघ तू ! (बाहेर येतो)

राजा : (त्रिलोकला प्रेमळ दमात घेत) ‘नांदी प्रेमाची’ या एकांकिकेत नायक आणि नायिका यांचं भांडण दाखवलंयस तू?

त्रिलोक : हो, का ?

राजा : नंतर मग नायक नायिकेची माफी मागतो?

त्रिलोक : हो !

राजा : तिच्या नाकदुऱ्या काढतो?

त्रिलोक : बरोबर, पण हे मला का सांगतोयस सगळं?

राजा : नाटकातनं लोकांना शहाणपणा शिकवायचा पण आपण स्वत: तो आचरणात नाही आणायचा!

त्रिलोक : (मुद्दा लक्षात येतो) हे बघ, तू आमच्या भानगडीत तोंड खुपसू नकोस... हे नाटक घे आणि निघ... तुम्हाला काय बदल करायचेत ते तुमचे तुम्ही खुशाल करा ! (स्क्रिप्ट टेबलावर आपटतो)

राजा : (अपमानित) मी बेकार जरूर आहे पण भिकारी नाही हे लक्षात ठेव!

त्रिलोक : (नरमत) म्हणजे?

राजा : मला अजूनही असं वाटतं की मी तुमच्या कुटुंबाचा एक भाग आहे...

त्रिलोक : (बदलत) आहेसच तू !

राजा : मी इथं येतो, जेवतो, राहतो पैसे उसने घेतो... तुमच्या सुख-दु:खाशी माझा काही संबंध नाही का? इतका कृतघ्न वाटलो का मी तुला?

त्रिलोक : अरे पण म्हणजे नक्की काय राजा?

राजा : वहिनींची माफी माग तू... आत्ताच्या आत्ता... अगदी हुबेहुब 'नांदी प्रेमाची' एकांकीकेत घडतं तसं दृश्य दिसलं पाहिजे मला... (त्याला धरून तिकडे नेत डायरेक्शन करीत) हे बघ... इथं तू असं गुडघ्यावर बसलेला आहेस... तू तिच्यावर हात उचलल्यामुळे ती भडकलेली आहे. आता जर तू तिची समजूत घालू शकला नाहीस तर आयुष्यभर पश्चाताप करत राहावा लागेल हे लक्षात आलंय तुझ्या! ओके ? घे बेअरिंग... रेडी ? वन्... टू... थ्री... (प्रकाश बदलतो. संगीत येते. एकांकिकेतील 'ते' दृश्य सुरू होते.)

त्रिलोक : (गुडघ्यावर बसलेला. एकांकिकेतील पत्नीला उद्देशून बोलत आहे) मला माफ कर... आय ॲम सॉरी. मी तुला असं बोलायला नको होतं. तू मला समजून घेशील असं वाटतं. (शांतता) दिसतांना एकत्र दिसतात माणसं. पण प्रत्येकजण खऱ्या अर्थानं आपापल्या कप्प्यातच जगत असतो. दुसऱ्याच्या मनाची पर्वाच करीत नाही तो. एखादी गोष्ट मनासारखी झाली नाही की माणसं लगेच चिडतात, भांडतात, जीवावर उठतात एकमेकांच्या. वर्षानुवर्षांचे संबंध क्षणात नष्ट होतात. प्रेमाची व्याख्यासुद्धा किती बेगडी असते आपली? आपण एकमेकांवर प्रेम करतो म्हणजे नेमकं काय करतो, तर एकमेकांच्या अपेक्षांवरच प्रेम करत असतो. तू मला किती दिलंस, मी तुला किती दिलं यावर आधारलेली असते आपली प्रेमाची कल्पना ! माणसांपेक्षा अपेक्षाच जास्त महत्त्वाच्या असतात आपल्या. म्हणजे एका अर्थी स्वत:वरच प्रेम करत असतो आपण ! प्रेमाच्या या क्षूद्र चौकटीत द्वेष, मत्सर, मोहाची वाळवी हळूहळू पोखरून काढायला लागते आपल्याला... आंधळे होतो आपण, अहंकारी होतो, अधिकार गाजवायला लागतो, साध्या साध्या आनंदांच्या क्षणांवर अपेक्षांचा वरवंटा फिरवत राहतो, दु:खी होत राहतो... आता लक्षात येतंय सर्व... आय ॲम सॉरी... रिअली सॉरी, मला माझी चूक उमजलीय. मला क्षमा कर... प्लीज... आयुष्यात अजून फार मोठा पल्ला गाठायचाय आपल्याला.मला सोडून जाऊ नकोस. प्लीज...

प्रतिभा : (एकांकिकेतील प्रेयसी) असा एखादा मोठा संवाद म्हटलं की संपलं सारं, असं वाटत असेल तुम्हाला... पण हेही एक पुरुषी कारस्थान! 'यत्र नार्यस्तु पूजन्ते रमन्ते तत्र देवता' असं एका बाजूनं म्हणायचं आणि दुसऱ्या बाजूनं 'न स्त्री स्वातंत्र्यम अर्हती' असं म्हणत तिला एका चौकटीत बंद करून ठेवायचं... हा दुटप्पीपणा तुमच्याकडून अपेक्षित नव्हता मला. आणि बायकोवर हात उचलणं हा तर रानटीपणाच झाला!

त्रिलोक : काय झालं ते माझं मलाच कळलं नाही... आय ॲम सॉरी... व्हेरी सॉरी... स्वत:वर नियंत्रण राहिलं नाही आणि उचलला मी हात तुझ्यावर. शपथ घेतो, पुन्हा असं कधी होणार नाही माझ्या हातून... क्षमा कर मला... प्लीज...

प्रतिभा : नेमकी आजच मी तुम्हाला एक महत्त्वाची बातमी सांगणार होते...

त्रिलोक : बातमी?

प्रतिभा : पण त्यातली गंमतच निघून गेली सगळी.

त्रिलोक : कसली बातमी? काय सांगणार होतीस? सांग ना, बोल!

प्रतिभा : म... मी... आई...

त्रिलोक : (त्याचा विश्वास बसत नाही) काय? आई ! म्हणजे बाळ? (कान पकडत, तोंडात मारून घेत) बाळ होणार आहे आपल्याला? माफ कर मला, तू सांगशील ती शिक्षा भोगतो, पुन्हा अशी चूक होऊ नये म्हणून काळजी घेईन मी...(मी बाप होणार आहे, आमच्या घरात बाळ येणार आहे... असं म्हणत स्टेजभर फिरतो. तिला जवळ घेतो. संगीत. एकांकिकेतील तो प्रसंग संपतो. राजा, रूपक टाळ्या वाजवतात. घरात पुन्हा आनंदी वातावरण. तेवढ्यात

दारावरची घंटा वाजते. एक  कुरियरवाला येतो आणि एक पत्र देऊन जातो. प्रतिभा, ‘बसा, भावजी मी  कांदेपोहे आणते’ असं म्हणत स्वयंपाकघरात जाते.)

राजा : (पत्र रूपककडे देत) कुणाचं आहे पत्र बघ. रूपक : (पत्ता पाहत, पुटपुटतो) सलीम नायकवडी, सांगली. (पत्र फोडून वाचू लागतो)  प्रिय सर, ‘डावा हात, उजवा हात’ या तुमच्या नाटकाचा प्रयोग आम्ही आमच्या  संस्थेच्या रौप्यमहोत्सवाच्या निमित्तानं केला. लोकांना खूप आवडलं नाटक! कोल्हापूरच्या एका निर्मात्याला त्यावर चित्रपट काढायचा आहे. ते लोक तुम्हाला मुंबईत येऊन भेटणार आहेत... तुमचं एखादं तरी नाटक आम्ही दरवर्षी स्पर्धेत करतो. आमच्या दृष्टीनं ते एक वर्कशॉपच असतं. तुमचे आगळे वेगळे विषय आणि सुंदर संवाद सर्वांना आवडतात. एखादं कॅरेक्टर उभं करण्याची तुमची ताकद शेक्सपिअरच्या जातकुळीची आहे असं आम्हाला इंग्लीश शिकवणारे इचलकरंजीकर सर म्हणतात. नाट्यलेखन ही एक प्रकारची दैवी देणगी आहे आणि ती नटेश्वरानं तुम्हाला भरभरून दिली आहे. उद्याची रंगभूमी तुमच्याकडे  मोठ्या आशेने पाहात आहे! ताजा कलम : फुल ना फुलाची पाकळी म्हणून मानधनाचा चेक सोबत पाठवला आहे त्याचा कृपया स्वीकार व्हावा, ही  विनंती. आपला, सलीम नायकवडी. (प्रतिभा येते आणि सर्वांना कांदेपोहे देते.)

राजा : बघा वैनी लोक किती प्रेम करतात तुमच्या नवऱ्यावर ते! आणि या वेळी चेकसुद्धा पाठवलाय सोबत मानधनाचा.

प्रतिभा : शंभर रुपयांचा असेल तो आणि त्यातले पन्नास रुपये तो क्लिअर करायला  लागतील.

त्रिलोक : अग, पन्नास तर पन्नास, पण सन्मानानं मिळालेत ना ते ! (राजाला) अलिकडं मला  खरंच  असं वाटायला लागलंय की राजीनामा द्यावा आणि पूर्णवेळ लेखनाला वाहून घ्यावं. (पाकिटातून राजीनाम्याचा कागद काढून दाखवत) हा बघ राजीनामा. लिहून खिशातच ठेवलाय. काल साहेबाचं आणि माझं भांडण झालं तेव्हाच त्याच्या तोंडावर फेकणार होतो पण कंट्रोल केलं स्वत:ला... मंगलाष्टक लिहून मागतो  स्साला...

प्रतिभा : उगाच काहीतरी वेडेपणा करून बसू नका.  नाटकाच्या धंद्याचं काही खरं नाही. (राजाला) भावजी तुम्ही समजावून सांगा यांना. एवढा चांगला पगार मिळतो, सरकारी का होईना पण राहायला घर आहे !

त्रिलोक : तू काळजी करू नको. पेपरात कॉलम लिहीन, परीक्षक म्हणून जाईन,  नाट्यशास्त्राच्या विद्यार्थ्यांना शिकवायला जाईन, काहीही करीन... तुम्हाला पोसण्याइतकी धमक आहे माझ्यात...

राजा : तो पाटील तुला त्रास देतोय हे खरं आहे पण इकडंसुद्धा निर्माते, दिग्दर्शक, नट आहेतच की रक्त शोषायला ! आणखी एक; या धंद्यात पडलास तर नोकरी बरी होती असं म्हणायला लागशील नंतर.

आणि तुझ्यासारखे चांगले अधिकारी सरकारमध्ये असणे ही लोकांसाठी आणि सरकारसाठीसुद्धा एक अभिमानाची गोष्ट आहे हे लक्षात घे!

त्रिलोक : विधान परिषदेत आणि विधानसभेत एकमुखी ठराव होऊन इतकी वर्ष  झाली तरीही  ज्याला बेळगाव महाराष्ट्रात आणण्याची फिकीर नाही ते सरकार माझ्यासारख्या लेखकाची काय तमा बाळगणार? नकोच मला असलं  डिपार्टमेंट आणि मंगलाष्टकं लिहायला सांगणारा साहेब !

रूपक : बाबाऽऽऽ

त्रिलोक : आता तुझं काय आणखी?

रूपक : (वहीत पाहत) नालासाठी घोडा गेला...

त्रिलोक : म्हणजे ?

रूपक : हा वाक्प्रचार माहीत आहे ना तुम्हाला?
त्रिलोक : नसायला काय झालं?
रूपक : एक साधा नाल न मारल्यामुळे घोडा धाऊ शकला नाही आणि घोडा धावू शकला नाही त्यामुळं अख्खं युद्ध गमावण्याची वेळ आली...
त्रिलोक : नेमकं काय म्हणायचंय तुला?
रूपक : (त्याच्या हातातून राजीनाम्याचा कागद ओढून घेत) तुम्ही इतकी सुंदर नाटकं लिहिता... इतकी सुंदर पात्रं उभी करता, इतके सुंदर संवाद लिहिता... इतक्या झपाट्यानं लिहिता...
त्रिलोक : तुला काय म्हणायचंय नेमकं?
रूपक : मग तुम्हाला साधं एक मंगलाष्टक लिहिता येऊ नये?
त्रिलोक : हे बघ रूपक, हा मंगलाष्टक लिहिण्याचा प्रश्न नाही, तत्त्वाचा आहे !
रूपक : तुम्ही तत्त्व सोडा असं कुठं म्हणतोय मी?
त्रिलोक : मग?
रुपक : तुम्ही फक्त एवढंच करायचं–
त्रिलोक : काय?
रूपक : असं समजायचं की तुमच्या नव्या नाटकात लग्नाचा एक प्रसंग आहे... आणि नायकाच्या मुलीसाठी मंगलाष्टकं लिहून हवी आहेत... (सारे विचारात पडलेले, हलकंसं संगीत.)
रूपक : (वहीत लपवलेली एक पुस्तिका काढून दाखवत) ही घ्या मंगलाष्टकांची पुस्तिका.... पाच रूपयांना मिळाली. यातली चाल घ्यायची आणि त्याच चालीवर लिहायचं... नाहीच जमलं तर यातलं एक तयार मंगलाष्टक घ्यायचं, त्यातल्या वधूचं आणि वराचं नाव बदलून तिथं तुमच्या साहेबांच्या मुलीचं आणि तिच्या नवऱ्याचं नाव टाकायचं की झालं ! काय नाव आहे साहेबांच्या मुलीचं?
त्रिलोक : (संमोहित झाल्याप्रमाणे) विजया.
रूपक : आणि मुलाचं?
त्रिलोक : वसंत.
रूपक : चला तर मग... आधी लगीन साह्यबाच्या मुलीचं... मग नाटकाचं ! हे बघा... (चालीवर म्हणू लागतो) आईने जपले मुली तुला, पुष्पापरी लाडके...
राजा : (त्याच्या हातून पुस्तिका काढून घेतो आणि पुढील मंगलाष्टक सुस्वर चालीत वधु-वरांच्या नावांसह म्हणू लागतो त्याला रूपक आणि प्रतिभाची साथ,)
आईने जपले मुली तुला, पुष्पापरि लाडके
वडिलांनी सुख दिले किती तुला, सांभाळुनी कौतुके
विजयाने वरिले तुज वसंता, साक्षीस मोरेश्वर
बाले ह्या समयी होतसे स्वप्न आज साकार ऽऽऽ
कुर्यात सदा मंगलम्...
शुभमंगल ऽऽऽ सा ऽऽऽवधा ऽऽऽन !

(रूपक राजीनामापत्राचे फाडून तुकडे करतो आणि अक्षदांसारखे टाकू लागतो.  ताशाचा कडकडाट. सनईचे सूर... टाळ्या... त्रिलोक गोधळलेला.  ‘शुभमंगल  साऽऽऽवधान’च्या गजरात पडदा.)

**मध्यंतर**

***

सूचना :

- या नाटकाचा पहिला अंक येथे दिलेला आहे ज्यांना आवश्यकता असेल त्यांनी पुढील पत्त्यावर माझ्याशी संपर्क साधून दुसरा अंक प्राप्त करून घ्यावा.

- या नाटकाचे सर्व हक्क लेखकाकडे राखीव आहेत.प्रयोगापूर्वी लेखकाची परवानगी घेणे बंधनकारक आहे. या नाटकाचे  भाषांतर, रूपांतर, त्यावर आधारित चित्रपट, चित्रमालिका, वेब-सिरीज, अभिवाचन, यूट्युब-फेसबुकवरील (किंवा अशाच प्रकारच्या विद्यमान अथवा भविष्यातील नव्या माध्यमातून) पूर्ण किंवा अंशतः असा कोणत्याही प्रकारचा आविष्कार, चित्रिकरण, ध्वनिमुद्रण, प्रसारण इत्यादीपूर्वी लेखकाची पूर्व परवानगी घेणे आवश्यक.यासंदर्भात काही वाद उद्भवल्यास संबंधित कायदेशीर कारवाई मुंबई कार्यक्षेत्रात होईल!

**प्रल्हाद जाधव (९९२००७७६२६)**
pralhadjadhav.one@gmail.com

***